स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

१९ वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट




बीड : प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील एका खेड्यातून आलम बशीर शेख हा ध्येयवेडा तरुण फक्त पोटाची खळगी भरण्यासाठीच नव्हे तर आपले नाव आयुष्यात आणि भविष्यात कोणीतरी आदराने घ्यावे हा प्रामाणिक आणि उदात्त हेतू ठेवून मुंबईत गेला. भाकरीची भ्रांत होती. खाण्या पिण्यासाठी आणि राहण्यासाठी टोकाचा संघर्ष सुरू होता. या दरम्यान आलम शेख सहज मंत्रालयात फेरफटका मारत असताना त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली. ती म्हणजे महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून येणाऱ्या पुढाऱ्यांच्या अंगावर पांढरे शुभ्र वस्त्र असतात. हे कपडे पाहून अशा कपड्यांचा व्यवसाय सुरू करण्याचा विचार त्यांच्या मनात आला आणि दृढ निश्चय केला. मंत्रालयासमोरच्या पार्किंगमध्ये एका भंगारात पडलेल्या अल्टो कारमध्ये पांढऱ्या शुभ्र वस्त्रांचे स्वप्नातील भव्यदिव्य दालन सुरू केले. आलम शेख आपल्या ध्येयाशी प्रामाणिक राहिल्यामुळे ते हे करू शकले. आज मुंबईमध्ये आलम शेख स्वत:च्या कुटुंबासह 40 तरुणांच्या कुटुंबीयांचा भक्कम आधार बनले आहेत. त्यांना आज आलम शेख म्हणून कोणी ओळखत नाही तर आलम पुढारी म्हणून त्यांना महाराष्ट्राच्या गल्लीबोळातील पुढारी ओळखतो. आलम बशीर शेख अर्थात आलम पुढारी यांच्याकडे पाहिले की, त्यांची यशोगाथा अनेकांना प्रेरणा देते. अनेकांना जीवनात यश मिळवण्यासाठी दृढनिश्चय आणि कठोर परिश्रम करण्याची आवश्यकता अधोरेखित करते.

**आलम पुढारी यांच्याकडे पाहून असे वाटते की, जिंदगी लंबी नहीं, खूबसूरत होनी चाहिए।**



# पुढाऱ्यांचा आवडता 'पुढारी'

## युवा महाराष्ट्राचा आयकॉन!

● महाराष्ट्रातील तरुणांचा आयकॉन होणं हे काही झोपेतून उठून सहज शक्य होत नसतं. त्यासाठी आपण आपल्या ध्येयाशी प्रामाणिक असायला हवं. अपार कष्ट करण्याची जिद्द आणि त्या कामात सातत्य असायला पाहिजे. जसे की, आलम पुढारी एक व्हिजय घेऊन काम करतात. आलम पुढारी यांच्या यशात टाईम मॅनेजमेंट अर्थात वेळेचे व्यवस्थापन या कौशल्याचाही मोठा वाटा आहे. त्याचबरोबर टीम वर्कने काम करणे हा आलम पुढारी यांचा आवडीचा विषय म्हणावा लागेल. म्हणूनच कमी वेळेत जास्त आउटपुट हे कौशल्य साधण्यातही त्यांना यश आले. महाराष्ट्रातील तमाम तरुणांसाठी आयकॉन आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्व असलेल्या आलम पुढारी यांच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी त्यांना 'दुवा में याद रखना' एवढेच!

## मुंबईत पोटाची खळगी भरायला गेला आणि आज 40 कुटुंबीयांचा बनला भक्कम आधार!

**कोणी कितीही वाईट बोलू किंवा वाईट करण्याचा प्रयत्न करो, आपण त्यांच्याविषयी तसेच इतरांविषयी चांगलेच बोलायचे आणि चांगलेच वागायचे. बोलण्यात स्पष्टोक्तेपणा ठेवायचा. कोणाच्या आयुष्यात डोकवायचे नाही आणि कुणाविषयी मागे वाईट चर्चा करायची नाही. फक्त स्वत: बरोबर दुसऱ्यांचे हित चिंतायचे कुणाच्या पुढे पुढे करायचे नाही. जिंदगी मस्तीत पण शिस्तीत जगायची! थंड पाणी आणि गरम इस्त्री जसे कपड्यांवरच्या सुरकुत्या घालवतात तसेच शांत डोके आणि उबदार मन आयुष्यातील चिंता घालवतात. म्हणून नेहमी हसत रहा, हा सुंदर जन्म पुन्हा नाही, असे आलम पुढारी मित्रांमध्ये वैचारिक गप्प निघाल्यानंतर हमखास सांगतात.**




**'वेड लागल्याशिवाय इतिहास घडत नाही', हे आलम पुढारी यांनी तरूणांना दाखवून दिले!**

**दृढनिश्चय केला तर आपण मोठ्या गोष्टी साध्य करू शकतो**

जीवनात कितीही अडचणी आल्या तरी आपण दृढनिश्चय केला तर आपण मोठ्या गोष्टी साध्य करू शकतो. जगात असे अनेक लोक आहेत जे अडचणी येतात तेव्हा निराश होतात. पण त्यांच्याशी स्पर्धा करून आयुष्यात नवीन उंची गाठणारे फार कमी लोक आहेत. त्यापैकीच आलम बशीर शेख अर्थात आलम पुढारी हे एक आहेत. आलम पुढारी यांच्या बाबतही असेच काहीसे घडले आहे. मुंबईत एक वेळ अशी होती की, उपाशी पोटी दिवस काढले. अशा काळातही त्यांनी त्यांचा आत्मविश्वास थोडाही डळमळू दिला नाही. विशेष म्हणजे जे काही धैर्य शिल्लक होते ते मित्र आणि नातेवाईकांच्या टोमण्यांमुळे नष्ट होऊ दिले नाही. म्हणूनच ध्येय वेड्या आलम पुढारी यांनी आकाशाला गवसणी घालीत इतिहास रचला आहे.

## वारकरी संप्रदाय सर्व जाती-धर्माला बरोबर घेऊन जाणारा- महंत शिवाजी महाराज

**नवगण राजुरी : प्रतिनिधी**

संपत्ती कमावण्यापेक्षा मुलांवर चांगले संस्कार करा. आजची मुले ही उद्याची राष्ट्राची संपत्ती आहे. मराठवाडा ही संतांची भूमी आहे. सर्व जाती–धर्माला बरोबर घेऊन जाणारा वारकरी संप्रदाय असल्याचे प्रतिपादन श्रीक्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांनी केले, तर जरूड ते सिरसाळा आणि शिरापूर फाटा ते सौताडा या दोन रस्त्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला असून तो मंजूर झाला आहे. त्याची निविदा प्रक्रिया होऊन हा रस्तादेखील पूर्ण होणार आहे. या रस्त्यामुळे दळणवळण सुविधा सुलभ होणार असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. माजी जि. प. सदस्य स्व. रेखा रवींद्र क्षीरसागर यांच्या तृतीय पुण्यस्मरणानिमित्त नवगण राजुरी येथे पंचदिनात्मक कीर्तन महोत्सवाचे आयोजन आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या महोत्सवाची सांगता श्री क्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, शिवाजी महाराज येवले, नारायण महाराज डिसले, मकरंद महाराज, रविंद्र क्षीरसागर, विलास बडगे, दिनकर कदम, नानासाहेब काकडे, सखाराम मस्के, डॉ. विठ्ठल क्षीरसागर, डॉ. योगेश क्षीरसागर, हेमंत क्षीरसागर, विजयराज बंब, अजित वरपे, बळीराम गवते, सुधाकर मिसाळ, सुभाष क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती

## आज जन सुरक्षा विधेयक विरोधात माकपचे निदर्शने

**नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहा : डॉ. संजय तांदळे**

**बीड : प्रतिनिधी**



सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३, ज्याअंतर्गत व्यक्ती व संघटना यांच्या विवक्षित बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध घालण्याच्या नावाखाली हे विधेयक अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा आणणारे आणि भारतीय संविधानातील अनुच्छेद १९ मध्ये दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारे आहे. हे विधेयक अत्यंत व्यापक आणि अस्पष्ट व्याख्या वापरून व्यक्ती व संघटनांवर कठोर निर्बंध लावण्याचा प्रयत्न करणारे असून, त्याचा गैरवापर राजकीय, सामाजिक आणि विचारसरणीच्या ● पान २ वर...

## पैठण नगर परिषद प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे कोर्ट रोड वर साचले पाणीच पाणी

**पैठण : सर्जेराव खडसन**

पैठण शहराला पिण्याचे पाणी पुरवठा करणारी पाइप लाइन नगर परिषदेच्या कामचुकार, व चालढकलीच्या कामामुळे पैठण न्यायालय परिसराच्या रस्त्यांवर दुसऱ्यांदा फुटून त्यातील पाणी तालुका पशु ( जनावराचा दवाखाना ) चे मुख्य प्रवेशद्वारातील जाण्या येण्याच्या रस्त्यावरच साचुन चिखल निर्माण झाला आहे .त्यामुळे दवाखान्यात उपचारासाठी येणारे जनावरेच नाहीतर त्यांना घेवून येणाऱ्या त्यांच्या मालकांनासुद्धा येथुन ये जा करतांना मोठी अडचण होत आहे .पैठण शहराला पिण्याचे पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन काही दिवसापुर्वी कोर्ट रोड वरील तालुका पशु ( जनावरांचा दवाखाना ) च्या प्रवेशद्वारासमोर फुटली होती.

स्थानिक नगर परिषदेने ती पाईप लाईन मागील पाच ते सहा दिवसात एकदा नाहीतर दुसऱ्यांदा दुरुस्त करूनही दुरुस्त झाली नसल्याने त्या पाईप लाईन मधील गाळ मिश्रीत पाणी पशु दवाखान्याच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ साचले त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी व चिखल निर्माण झाल्याने या कार्यालयातील अधिकारी कर्मचारी तर सोडाच दवाखान्यात उपचाराकरिता येणाऱ्या जनावरांना व त्यांच्या मालकांना सुद्धा येथे प्रवेश करतांना मोठ्या प्रमाणावर अडचणी येत आहे .यामुळे तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकीत्सालय ( जनावरांचा दवाखाना ) कार्यालयाकडून दी. १७/४/२५ रोजी शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या पाईप



लाईन दुरुस्तीच्या कामामुळे दवाखान्याच्या प्रवेशद्वारासमोर साचलेले पाणी व चिखलाची आपण विल्हेवाट लावुन समोरील भाग येण्या जाण्याकरिता सुरळीत करून देण्यात यावा अशा आशयाचे लेखी पत्र नगर परिषद प्रशासनास देण्यात आले .परंतु तीन दिवस उलटले आहे तरी स्थानिक नगर परिषद प्रशासनाचे या साचलेल्या चीखलमय पाण्याची विल्हेवाट लावण्यासंदर्भात कोणतेही ठोस पावले उचलेले दिसत नाही.




संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता एस. एस. भगत यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना शिवक्रांती संघटनेचे विभागीय अध्यक्ष संतोष गायकवाड यांच्यासह महत्त्वाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## ॲड. सुभाष राऊत -सौ. सविता राऊत यांच्या लग्नाच्या 25 व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव



बीड : अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत आणि सौ. सविता राऊत यांच्या लग्नाच्या 25 व्या वाढदिवसानिमित्त हॉटेल सनराईज बीड येथे त्यांना शुभेच्छापर आशीर्वाद देताना आमदार मा. पंकजभाऊ भुजबळ

**विकास कामांची नांदी** ➤ **सभापती किरण पाटील, लोकनेते आ. सुरेश धस यांच्या प्रयत्नांना यश**

# शिरूर (का) येथे स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समितीला मंजूर

**पाटोदा : प्रतिनिधी**



पाटोदा येथे १९८४ साली कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन झाली व त्यानंतर शिरूर कासार आणि अंमळनेर ( भां ) या ठिकाणी उपबाजार पेठ म्हणून मान्यता मिळाली तेव्हापासून कृषी उत्पन्न बाजार समितीची ही फक्त नावापुरतीच होती, ही गोष्ट लक्षात घेऊन आमदार सुरेश आण्णा धस यांनी पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या एप्रिल २०२३ च्या निवडणुकीमध्ये उतरले आणि त्यावेळी शिरूरकरांना आश्वासन दिले की, बाजार कमिटी माझ्या ताब्यात आल्यानंतर शिरूरला स्वतंत्र बाजार समितीचा दर्जा मिळवून देईल. अनेक वर्ष इतरांच्या ताब्यात असणारी मार्केट कमिटी आ .सुरेश धस यांच्या ताब्यात आली. त्यावेळी आश्वासन दिल्याप्रमाणे लोकनेते आ .सुरेश आण्णा धस यांनी सभापती सौ रूपाली किरण पाटील आणि संचालक मंडळांना सूचना देऊन दि. ८ मार्च रोजी विशेष सभा बोलावून पाटोदा आणि शिरूर मार्केट कमिटीचे विभाजन करण्याचा ठराव सभापती सौ रूपाली किरण शिंदे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंजूर करून घेतला. त्याचा पाठपुरावा करून पाटोदा आणि शिरूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे विभाजन करून शिरूर कासारला स्वतंत्र मार्केट कमिटीला मंजुरी मिळाली.

● पान २ वर...

### पाटोदा बाजार समितीमधील विविध कामे प्रगतीपथावर



● पाटोदा या ठिकाणी ८० टनी वजन काटा बसवणे तसेच शेतकरी भवन उभारणे आणि शेतकऱ्यांसाठी गोडाऊन उभारणे मार्केट यार्डला प्रवेशद्वार बांधणे ही कामे प्रगतीपथावर आहेत. बाजार समितीच्या निवडणूक प्रसंगी आमदार सुरेश धस यांनी दिलेली सर्व आश्वासने पूर्ततेच्या मार्गावर असून सर्वात महत्त्वाचे शिरूर कासारला स्वतंत्र मार्केट कमिटीचा दर्जा मिळवून देणारच हे आश्वासनआ .सुरेश धस यांनी पूर्ण केले असून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### विविध सुविधा असलेली पाटोदा बाजार समिती एकमेव

● मुख्य बाजार समिती पाटोदा आणि उपबाजार पेठ शिरूर कासार आणि अंमळनेर या ठिकाणी बाजार समिती फक्त कागदावरच होती प्रत्यक्ष मात्र बाजार समितीमध्ये कसलेच व्यवहार होत नव्हते आणि कुठल्या सुख सुविधा नव्हत्या परंतु आमदार सुरेश धस यांच्या ताब्यात मार्केट कमिटी आल्यापासून सभापती, उपसभापती आणि सर्व सन्माननीय संचालक मंडळ यांचा मार्गदर्शनाखाली पाटोदा आणि शिरूर या ठिकाणी रस्ते, लाईट, पाणी, व्यापारी गाळे आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या. कर्मचाऱ्यांना महिन्याची महिन्याला पगार देण्यात येतो.

विशेष

# धगधगता ज्वालामुखी- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती केवळ १४ एप्रिल रोजीच साजरी केली जाते असे नव्हे तर संपूर्ण महिनाभर ही जयंती विविध ठिकाणी साजरी केली जाते. अगदी मार्च महिन्यांच्या शेवटीच जयंतीचे वेध लागतात. सर्वत्र जोरदार तयारी सुरू होते. या निमित्ताने त्यांच्या विचारांचा वारसा असंख्य वर्ष जपण्यासाठी आम्ही सज्ज असतो. बाबासाहेबांविषयी एक छान लेख अलिकडेच वाचण्यात आला तो आमच्या वाचकांसाठी येथे देत आहोत.....

‘ असे किती दिवस आले आणि गेले ‘ परंतु हजारो वर्षे आम्हाला वाट बघावी लागली. तेव्हा कुठं आमच्या बहुजनांच्या जिवनात सोनेरी पहाट उगवली. हजारो वर्षापासून दलीत, आणि बहुजन समाज अत्याचार व जुलूम सहन करीत होता. या अत्याचाराविरुद्ध बंड फुकारण्यासाठी १४ एप्रिल हा सोनेरी दिवस उजळला.१४ एप्रिल हा प्रत्येक भारतीयांसाठी सोनेरी दिवसच आहे.या दिवशी धगधगता ज्वालामुखी, महामानव , क्रांतीसुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म झाला.जर १४ एप्रिल ही सोनेरी पहाट उगवली नसती तर, खरच आजही दीनदलीत, बहुजन समाज आणि आपल्या भारत देशाची स्थिती खुप दयनीय राहिली असती. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म म्हणजे नव्या युगाचा प्रारंभ होय. त्यांचा जन्म म्हणजे गुलामगिरी नष्ट करून नवक्रांतीचा दिवस आहे. या महामानवाचे आपल्यावर आणि भारत देशावर येवढे उपकार आहेत की , ते शब्दात व्यक्त करूच शकत नाही. म्हणूनच बाबासाहेबाला देशाचा चमकता तारा म्हंटल आहे. कल्पना करा १४ एप्रिल हा दिवस उगवला नसता तर आजही अस्पृश्य लोकांना गुलामगिरीत आणि दारिद्रीमध्ये जिवन जगावं लागले असते. हजारो वर्षापासून उच्चवर्णीय लोक जे अस्पृश्य आणि शूद्र लोकांचा जो अमानुष छळ करीत होते. ते आजही तसच राहिले असते. बाबासाहेबांनी आपल्याला नवजन्म दिला आहे. त्यांनी आपल्याला माणूस म्हणुन जगण्याचा अधिकार दिला आहे. बाबासाहेबांचा जन्म म्हणजे नवयुगाचा आरंभ होय.आंबेडकर म्हणजे जातीयतेवर आणि विषमतेवर सोडलेली सुदर्शन चक्र होय.

आंबेडकर म्हणजे जुलुमाविरुद्ध आणि अत्याचाराविरुद्ध लढणारा धगधगता ज्वालामुखी होय. हजारो वर्षापासून समाज हा जातियतेवर आणि विषमतेवर आधारित होता .बाबासाहेबांनी ते फक्त ५० वर्षात पालटून टाकले. संविधान लिहून भारत देशात लोकशाही आणली. प्रत्येक नागरिकाला समान अधिकार मिळवून दिला.मग बाबासाहेबांचा जन्म म्हणजे सोनेरी युग आहे हे म्हणणे चुकीचे नाही. आज आपल्या देशामध्ये संविधान लागून ७२ वर्षे झाली



तरीपण आपण नेहमी वर्तमानपत्रामध्ये वाचतो की, समाजात आजही जातीयता पाळली जाते, दलीत लोकांवर आजही अत्याचार केला जाते. लोकशाही असून सुध्दा आपल्या देशात आज स्थिती आहे तर आधी किती बिकट परिस्थिती असणार. कल्पना करा बाबासाहेबाना किती हालअपेष्टा सहन करावे लागले असणार. बाबासाहेबांचा जन्म एका गरीब कुटुंबामध्ये झाला होता. त्यांना तर लहानपणापासूनच जातीयता, आणि अस्पृश्यता यांचे चटके सहन करावे लागले. आधी तर अस्पृश्य लोकांला शिकण्याचा अधिकार नव्हता , बाबासाहेब वर्गाच्या बाहेर बसून शिकले. आणि आज त्यांच्यामुळेच आपण सर्व जातीधर्मातील लोक एकत्र बसून शिक्षण घेत आहोत.

बाबासाहेब म्हणतात की माझ्याएवढी गरिबी देशातील कोणत्याच नेत्यांनी बघितली नसेल. त्यांना माहिती होते की समाजामध्ये जर प्रगती करायची असेल तर आधी लोकांना शिक्षित करावे लागेल. अशिक्षित लोकांना त्यांचावर अत्याचार, अन्याय होत आहे हे सुध्दा कळत नव्हते. शिक्षण घेतल्याने माणूस विचार करायला लागते. त्यांच्यामध्ये अत्याचाराविरुद्ध लढण्याची ताकद येतो. बाबासाहेबांना समाजातील लोकांवर होणारा अत्याचार पाहून चिड यायची. एखादया पशू पक्षी याला तलावातील पाणी पिण्याचा अधिकार आहे परंतू अस्पृश्य जातीतील लोकांनी पाणी पिला तर लोक विटाळ मानायचे. हे बघून त्यांचं रक्त सळसळत होते. म्हणुन त्यांनी चवदार तळ्याचा सत्याग्रह केला .आणि संपूर्ण अस्पृश्य लोकांसाठी पाण्याचे द्वार खुले केले. पिण्याच्या पाण्यासाठी जगामध्ये एकमेव असा सत्याग्रह झाला. बाबासाहेबांनी आपल्याला पिण्याच्या पाण्यापासून तर आपल्या अधिकारापर्यंत हे खूप मेहनत करून लढून मिळवून दिले आहे. त्यांच्या पुण्याई मुळेच आपण सर्व आज स्वाभिमानाने आणि सन्मानाने जिवन जगत आहोत. बाबासाहेबांनी सर्व नागरिकांसाठी आणि समाजासाठी येवढे मोठे कार्य करून ठेवले आहेत . तरीपण काही लोक बाबासाहेबांना जातीच्या एका चौकटीत बघतात. म्हणजे आजही लोकांच्या मनातून जातीयतेचे विष गेले नाही हेच समजावं लागेल. समाजसुधारक हे कोणत्या जातीचे नाही तर संपूर्ण देशाचे असतात .बाबासाहेबांनी संविधानात केलेले काम हे समाजातील प्रत्येक जाती धर्मातील लोकांसाठी समान आहे. संविधानाने प्रत्येकाला समान न्याय, कायदा आणि अधिकार दिले आहेत . बाबासाहेबांनी स्त्रियांसाठी केलेले काम खुप मोठे आहे. आज स्त्रियांना सन्मानाने जगण्याचा जो अधिकार आहे ते बाबासाहेबांची पुण्याई आहे. त्यांनी संविधानात स्त्रियांना अधिकार मिळवून दिला. ज्यामुळे आज स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करतात. स्त्रियांना आरक्षण मिळवून दिला. प्रसूती रजा मंजूर केली. बाबासाहेबांनी स्त्रियांसाठी केलेले कार्य कधी न विसरण्याचे आहे. आधी स्त्रियांची खुप बिकट परिस्थिती होती. तिला चूल आणि मूल एवढंच काम होता. स्त्रियांवर खूप मोठ्या प्रमाणात अत्याचार केला जायचा. परंतु आज बाबासाहेबांनी संविधानात स्त्रियांना समान अधिकार मिळवून दिला. ज्यामुळे स्त्रिया इंजिनिअर, डॉक्टर, पंतप्रधान आहेत .आज आपण ज्या काही स्त्रिया नोकरीवर आहेत त्या सर्वांनी व प्रत्येक स्त्रीने रोज बाबासाहेबांचे उपकार




विशेष
प्रिती व्ही. खोब्रागडे
● ता– लाखनी, जी – भंडारा


मानले पाहिजे.


“धन्य भीम बाबा तूझी महिमा अपार होती |
तुने समानतेची तरतूद त्या घटनेत केली नसती,
तर या देशात राष्ट्रीय एकात्मता राहिली नसती,
अन् माझ्यासारख्या मुलीची लिहण्याची हिम्मत
राहिली नसती“||

देशातील प्रत्येक नागरिक हा संविधानासमोर समान आहे. संविधानापुढे कुणी श्रीमंत किंवा गरीब नाही. प्रत्येकांसाठी समान कायदे आहेत. आजही काही स्त्रियांना बाबासाहेबांनी आपल्यासाठी काय केले हे माहिती नाही. कारण त्यांनी कधी इतिहासच वाचला नाही. जो इतिहास वाचतो तोच इतिहास घडवतो. बाबासाहेबांनी म्हंटले होते की ‘ वाचाल तर वाचाल ‘ पण आता वाचण्याची संस्कृती लोप पावत आहे. बाबासाहेब समजण्यासाठी आधी बाबासाहेबांना वाचावे लागेल. बाबासाहेबांनी लिहलेल्या संविधानामुळेच आज आपण सर्व जाती धर्माचे लोक मिळुन मिसळून जगत आहोत. बाबासाहेब हे कोणत्या एका जातीचे नाही तर संपूर्ण देशाचा चमकता तारा होता. हा तारा जर नसता तर आजही आपल्या जीवनात अंधारच असता. अंधारातून प्रकाशाची वाट दाखविणाऱ्या या महामानवाची जयंती प्रत्येक नागरिकांनी साजरी करायला पाहिजे. बाबासाहेबांची जयंती ही नाचून नाही तर वाचून साजरी केली तर , नक्कीच त्यांनी बघितलेले स्वप्न साकार होतील.

बाबासाहेबांनी भारत देशाला दिलेल्या संविधानाची आज प्रत्येक नागरिकांनी रक्षण केले पाहिजे. कारण संविधानामुळेच आपले अस्तित्व आहे.

“||” झाले अन् होणार कितीही विद्वान
कुणीच टिकणार नाही तुझ्यापुढे
खरच कोटी कोटी उद्धारली कुळे
भिमा तुझ्या जन्मामुळे. ||

# 31व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रविण गायकवाड यांची निवड



31व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी जेष्ठ साहित्यिक प्रवीण गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. चला याबद्दलची अधिक माहिती जाणून घेऊया .अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित 31व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक प्रवीण गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. याबाबतची माहिती परिषदचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांनी दिली.

शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांचे विचार आत्मसात करून समता, बंधुता व एकात्मता ही मूल्ये केंद्रस्थानी ठेवून गेली 35 वर्षे सामाजिक प्रबोधन व परिवर्तनासाठी गायकवाड कार्यरत आहेत. ‘मराठे शूद्र, हिंदू की ब्राम्हणी, आरक्षण, शिवचरित्रातून रामदास व दादोजी कोंडदेव हटावो, ‘संभाजी ब्रिगेड : एक अभ्यास’, ‘मराठा क्रांती मोर्चा’ यांसारख्या महत्त्वपूर्ण ग्रंथांचे लेखन त्यांनी केले आहे. याशिवाय त्यांनी सामाजिक व ऐतिहासिक विषयांवर 3000 हून अधिक व्याख्याने दिली आहेत.

या संमेलनाचे आयोजन 9 व 10 मे 2025 रोजी कराड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात होणार आहे. संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते होईल. ग्रंथदिंडी, उद्घाटन समारंभ, परिसंवाद, चर्चासत्र, कथाकथन, कविसंमेलन असे विविध कार्यक्रम संमेलनात होणार असून देशभरातून सुमारे 900 साहित्यिक यामध्ये सहभागी होणार आहेत .याआधी हे संमेलन पुणे, मुंबई, नांदेड, उदगीर, तुळजापूर, लातूर, धाराशिव, वणी, रत्नागिरी, गोंदिया, शेवगाव, बारामती, मंठा, सोलापूर व छत्रपती संभाजीनगर येथे पार पडले आहे. नारायण सुर्वे, मंगेश पाडगांवकर, द. मा. मिराजदार, शिवाजी सावंत, सुरेश भट, केशव मेश्राम, विश्वास पाटील, सुवर्णा पवार, श्रीपाल सबनीस, गंगाधर पाणतावणे, जनार्दन वाघमारे, भास्कर चंदनशिव, मुरहरी केळे अशा मान्यवरांनी यापूर्वी संमेलनाध्यक्षपद भूषवले आहे.

संमेलनाच्या तयारीसाठी नुकतीच एक बैठक कराड येथे डॉ. शरद गोरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी सर्वानुमते प्रवीण गायकवाड यांची संमेलनाध्यक्षपदी निवड करण्यात आली. बैठकीस पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. नितीन नाळे, कोल्हापूर विभागीय अध्यक्ष विकास भोसले, सातारा जिल्हाध्यक्ष संदीप पवार, महाराष्ट्र उपाध्यक्ष डॉ. हनुमंत चिकणे, कार्याध्यक्ष विक्रम शिंदे, कराड तालुका अध्यक्ष डॉ. शंकरराव खापे, उपाध्यक्ष डॉ. दादाराम साळुंखे, सचिव प्रकाश पिसाळ तसेच किशोर पाटील, मानसिंग पाटील, वामन अवसरे, सुशील कांबळे, रामचंद्र पाटील, विजय कोळेकर, विद्या पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

कविता...

मी आणि तु
शब्द आहेत दोन
अर्थ मात्र एक,
मला कळत नाही मी
का तुझा विचार करते!
पण तु माझाच आहेस
एवढं मात्र ठाम सांगते!!

शितल सत्वधर



# इंग्रज या देशात काही दिवस असते तर?


अंकुश शिंगाडे
● नागपूर मो. 9373359450


धर्म....... धर्मातील भांडण. अमूक धर्म चांगला व अमूक धर्म वाईट. यावरुन भांडण, वादविवाद. विटाळ...... विटाळाची भांडणं. काही ठिकाणी अस्पृश्यांनी नवीन कपडे परीधान केले म्हणून भाडणं. काही ठिकाणी अस्पृश्य शेतात गेला म्हणून भांडणे. काही ठिकाणी अंधश्रद्धेवरुन भांडणं. तर तर काही ठिकाणी सुधारणेतून भांडणे. यातूनच बलात्कार व गुन्हेगारीला वाव मिळत असतो.

भांडणे नेहमीच होत असतात. कारण सर्वांना आपआपल्या गोष्टी प्रिय असतात. धर्महीप्रियच असतो. शिवाय धर्म वाढविण्यासाठी प्रयत्न केला जातो. प्रत्येकाला त्यांचा त्यांचा धर्म आवडतो म्हणून. एका व्हाट्सअप ग्रुपवर असंच भांडण. दोघांचे भांडण सुरु होते. एक म्हणत होता, अमूक धर्म चांगला व अमूक धर्म वाईट. त्यावर दुसरा वेगळीच प्रतिक्रिया देत होता. भांडण चांगलेच रंगात आले होते. त्यांचे त्याला म्हणणे.

''तुम्ही मनुवादी आहात.''

त्यावर उत्तरात म्हटलं गेलं,

''मी मनुवादी नाही. परंतु हिंदू आहे. मला हिंदू धर्म आवडतो. कारण माझ्या बिरादरीतील कित्येक लोकांना, या धर्मानं हिंदू म्हणून का असेना, आजपर्यंत टिकवून ठेवलं. म्हणूनच मी आज जीवंत आहे व बोलू शकत आहे. नाहीतर आपल्या सर्व बिरादरीतील लोकांचे जबरदस्तीनं धर्मांतरण करणारे व हत्या करणारे या जगात होतेच.''

पुढील व्यक्ती हा कदाचीत बुद्धीष्ट असेल व त्यानं बुद्ध धम्म स्वीकारलाही असेल. तसा तो म्हणाला,

''अहो, बोलायला संविधानाने शिकविले. तशी मुभा दिली. नाही तर आपल्याला कुठं गतकाळात बोलता येत होते.''

पलीकडील उत्तर देणा–यांचे संभाषण सुरुच होतं. तसा दुसरा व्यक्ती उत्तरादाखल म्हणत होता.

''बादशाहा बाबरपासून तर औरंगजेबांपर्यंत आपल्याही बिरादरीतील लोकांसह कित्येकांना मुस्लीम बनवलं गेलं जबरदस्तीनं. म्हणूनच तर खुद्द बाबासाहेबानं मुस्लीम धर्म नाकारला होता. हे त्यांनी त्यांच्या शेवटच्या अनरिचेबल थॉट या ग्रंथात लिहून ठेवलंय. शेवटचा बाबासाहेबांच्या हातचा ग्रंथ. परंतु त्यांनी हिंदू धर्मही नाकारला होता. त्याचं कारण होतं, हिंदू धर्मातील काही लोकांचं वागणं. ते वागणं तांदळाच्या खड्यासारखे होतं. तांदळात दोनचार खडे असले की सगळा तांदूळ खराब होतो तसं.''

ते त्याचं उत्तर. त्यावर तो म्हणाला,

आपण बिनडोक आहात. आपल्याला अक्कलच नाही. म्हणूनच आपण त्या धर्मात आहात. नाहीतर केव्हाचाच आपण आपला धर्म आपण बदलवला असता.''

ते त्याचं बोलणं. ती काढलेली अक्कलच. ते पाहून उत्तर देणारा व्यक्ती म्हणाला,

''मी तर बिनडोकंच आहे. परंतु आपल्याला जर डोकं आहे तर हा वादविवाद नाही हे लक्षात घ्या आधी. ही एक चर्चा आहे. आपण माझ्याच डोक्यात आपले



विचार टाकू शकत नाही. काय आपण इतर आपल्याच समाजाच्या लोकांच्या मनात आपले विचार पेरु शकाल? बोलणं सोपं असतं. करणं अवघड. मी भांडत नाही आहे, चर्चा करीत आहे. माझे विचार त्यावरच अवलंबून असतात. आता कोणाला राग येत असेल त्यात मी काय करु? मला त्याचा फायदाच होतो. मला माझे विचार प्रगल्भ करण्यासाठी विषय सापडतात. आधी आपण स्वत : त्या धर्मातील संपुर्ण नियम पाळून दाखवा. मगच अक्कल सांगा.''

धर्म....... धर्म कोणतेही असोत. प्रत्येकाला त्याचा त्याचा धर्म आवडतोच. जरी धर्मात बरेच नियम असले तरी व ते नियम पाळणं गरजेचं असलं तरी. ते नियम समजा नाही पाळले तर त्या व्यक्तीला निष्काषीत केलं जातं तरीही.

पुर्वीही असंच व्हायचं. ते नियम न पाळल्यास वाळीत टाकण्याचा समाजाचा नियम होता. अन् मंदिरातील स्पृश्यांचे नियम पाळले नाहीत तर आपलीच माणसं आपल्यालाच वाळीत टाकत असत. ज्यात सायंकाळी स्पृश्य वस्तीत जाणे. कधी त्यांच्या विहिरीला हात लावणे इत्यादी.

भारत स्वतंत्र होण्यापुर्वी येथील अस्पृश्य समाज हा विटाळाच्या विळख्यात होता. तसाच धर्माच्याही. त्यांना मानाचं स्थान नव्हतं. त्यांना भेदभावानं गुरफटलं होतं. तसं पाहिल्यास इंग्रज सुधारणाही करीत होते. त्यांनी ब–याच सुधारणा केल्या. त्या सुधारणा आवडत नसलेला समाज स्वातंत्र्य मागत होता. तसे बाबासाहेबही स्वातंर्त्याच्या विरोधात नव्हतेच. परंतु बाबासाहेबांना वाटत होतं की जर या देशातील इंग्रज निघून गेले. तर सुधारणा होणार नाही. अस्पृश्यांना वर उठता येणार नाही.

हा समाज स्वातंत्र्यानंतर त्यांना वर उठू देणार नाही. म्हणूनच बाबासाहेब म्हणत होते की आम्हाला आधी सुधारणा हव्यात. त्यानंतर स्वातंत्र्य. कारण स्वातंत्र्यानंतर सुधारणा घडूनच येणार नाही. देशातील लोकांना सुधारणा हव्या नाहीत हे त्यांना माहीत होतं. त्यांना अस्पृश्य स्पृश्य यांच्यात भेदभावच हवा होता. त्याचं कारणही होतं, ते म्हणजे आजपर्यंत लोकांनी तसंच विदेशी शासकांनी सुधारणा केल्या नव्हत्या. इंग्रज सुधारणा करु पाहात होते. त्या सुधारणा इंग्रजांना करु द्यायच्या नव्हत्या. अन् तसंच झालं. स्वातंर्त्य मिळालं. संविधान आलं. तरीही येथील भेदभाव गेला नाही. येथील काही वाईट प्रथाही गेल्या नाहीत. त्या अजुनही सुरु आहेत. तेच खुपतं येथील काही लोकांच्या मनात. अन् खुपणंही साहजीकच आहे. कारण त्यांना समाजात बदल हवा आहे. नव्या स्वरुपाचा. त्यांना अंधश्रद्धा हव्या नाहीत. अन् अंधश्रद्धा पाळणारा धर्मही हवा नाही. म्हणूनच धर्मावरून भांडणं होत असतात.

आजचा काळ पाहिल्यास इंग्रज गेले देशाला स्वातंर्त्य देवून. तरी आजही भेदभाव गेलेला नाही. काही ठिकाणी अस्पृश्यांनी नवीन कपडे घालणंही स्पृश्यांना आवडत नाही. त्यांनी घरेदारे बांधणंही त्यांना आवडत नाही. व्यतिरीक्त त्यांना पंगतीत जेवन चारणंही आवडत नाही. काही ठिकाणी आजही लग्न समारंभात अस्पृश्यांना न बोलवता त्यांच्या घरी त्यांनीच स्वयंपाक बनवावं म्हणून दोन आलू व थोडेसे तांदूळ त्यांना देण्याची प्रथा आहे. काही ठिकाणी आपल्या घरची अलाबला वा पीडा निघावी म्हणून अस्पृश्यांना कपडे व सुग्रास अन्न, तेही दरवाजात बसवून देण्याची प्रथा आहे. तसंच अस्पृश्यांनी असंच वागावं. तसंच वागावं. असं वागू नये. तसं वागू नये. ही सारी बंधनं आहेत. भारत स्वतंर्त्य झाला असला तरी. तसंच सुधारणांच्या बाबतीत सांगायचं झाल्यास काल ज्या इंग्रजांनी सुधारणा केल्या, त्या बरे झाले. नाहीतर आजही त्या अस्तित्वातच राहिल्या असत्या, जरी इंग्रज देश सोडून निघून गेले असले तरी. आजही देशात देव्या अंगात आणणे. मुर्तीसमोर कोंबड्या बक–यांचा बळी देणे, गळ्यात गंडेदोरे बांधणे, मांजर आडवी गेल्यास वा घुबड ओरडल्यास अंधश्रद्धा मानणे, मांत्रीक पाळणे व मंत्रविद्येवर विश्वास ठेवणे. कोणी मरण पावल्यास विटाळ मानणे, टक्कल करुन चेहरे विद्रूप करणे, एवढंच नाही तर रजस्वाचा विटाळ मानणे, होमहवन करणे, मुर्तीपुजा करणे. या अंधश्रद्धा आहेत व या अंधश्रद्धा अजूनही सुरुच आहेत. काही ठिकाणी बालविवाहही आहेत आणि काही ठिकाणी विधवांचं पांढरी साडी परीधान करणं. बांगड्या फोडणं वैगेरे सर्व काही. तसं पाहिल्यास आजही लाखो रुपये खर्च करुन मुर्त्या बनवल्या जातात व त्या पुर्णत : पाण्यात बुडवल्या जातात. असं करण्याऐवजी तोच पैसा गरीबांना दान दिला तर? बिचा–यांची मुलं तरी शिकू शकतील. उच्च शिक्षण घेवू शकतील. परंतु तसं होत नाही. त्यांचं मूल शिकायलाच नको. ही आपली भावना. सर्व रस्सीखेच. त्यामुळं आज असं वाटू लागतं की इंग्रज बरे होते. हळूहळू सुधारणा तर होत होत्या. ते काही दिवस भारतात थांबले असते तर नक्कीच भारतात एक नवा बदल दिसला असता.

स्पृश्य अस्पृश्य भेदभाव कायमचा संपला असता. अंधश्रद्धा पुर्णच संपल्या असत्या. ना कोणाच्या अंगात देव्या आल्या असत्या. ना रजस्वाचा विटाळ राहिला असता. बालविवाह पुर्ण संपला असता. शिवाय बलात्कारावर व गुन्ह्यावर कडक कायदे बनले असते व बलात्कार तसेच गुन्हेही घडले नसते. ते संपले असते कायमचेच. अन् संपले असते धर्मातील भांडणंही. या भारतात हिंदूच नाही तर इतर सर्वच धर्म अगदी गुण्यागोविंदानं नांदत राहिले असते यात शंका नाही.

पान ४, व १ वरून

## मेष, सिंह, तूळ, कुंभ राशीसह इतर राशींसाठी सोमवारचा दिवस कसा असेल, जाणून घ्या

● पान ४ वरून ... शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. नोकरीच्या शोधात असलेल्या लोकांना उद्या यश मिळू शकते. उद्या वैवाहिक जीवनात प्रेम आणि परस्पर सहकार्य असेल.

**धनु रास** उद्याचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत :च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर उद्या ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. उद्या तुम्ही कामाच्या ठिकाणी एक संघ म्हणून काम कराल आणि उद्या तुम्हाला त्याचा फायदा होईल.

**मकर रास** उद्याचा दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. उद्या तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु उद्या कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. उद्या तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

**कुंभ रास** कन्या राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

**मीन रास** मीन राशीसाठी उद्याचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही उद्या यशाकडे वाटचाल कराल. उद्या व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर उद्या ती सुधारेल.

## आज जन सुरक्षा विधेयक विरोधात माकपचे निदर्शने

आधारे दडपशाही करण्यासाठी केला जाऊ शकतो. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे कोणत्याही लोकशाही देशाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असून, त्यावर कोणत्याही प्रकारची बंधने लादणे हा लोकशाही मूल्यांचा –हास आणि नागरिकांच्या हक्कांचा अवमान आहे .या विधेयकामुळे महाराष्ट्रातील नागरी हक्क, लोकशाही मूल्ये आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गंभीर परिणाम होईल. म्हणजेच सरकारच्या चुकीच्या निर्णयाविरुद्ध अथवा एखाद्या सरकारी अधिकाऱ्याने केलेल्या अन्यायाच्या विरोधात आंदोलनाच्या मार्गाने दात मागणे हे देखील बेकायदेशीर ठरल्यामुळे जनतेचा सरकार विरोधी आवाज पूर्णपणे दडपून टाकला जाणार आहे तेव्हा लोकशाही व्यवस्था जिवंत ठेवण्यासाठी डाव्या आघाडीच्या वतीने आज मंगळवारी दिनांक 22 एप्रिल 2025 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय समोर निदर्शने आंदोलन करण्यात येणार असून या आंदोलनास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेचे अध्यक्ष तथा सेवानिवृत्त ईपीएस 95 समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष डॉ. संजय तांदळे व मराठवाडा शिक्षक संघटनेचे निमंत्रक प्राचार्य डी जी तांदळे , बीड शहर बचाव मंचचे अध्यक्ष नितीन जायभाये यांनी केले आहे.

## शिरूर (का) येथे स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार

**पाटोदा बाजार समितीचे छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड असे नामकरण**...गेली अनेक वर्षापासून संस्थेचे ऑडिट नव्हते ते साधारण १२ ते १३ वर्षाचे ऑडिट करून घेतले.

अनेक वर्षे अंशदान भरण्यात आले नव्हते ते भरले. पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीला छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड असे नामकरण केले आहे तसेच महाराष्ट्र राज्य कृषी पणन महासंघाची व पाटोदा नगरपरिषदेची पी टी आर मान्यता घेऊन व्यापाऱ्यांना भूखंड करारावर देणे चालू आहे. पाटोदा या ठिकाणी अनेक शेतकऱ्यांनी आपले भूखंडावर बांधकाम केले असून बाजार समितीमध्ये प्रत्यक्ष लिलावाला मे २०२५ मध्ये सुरुवात होत आहे.


सांज दैनिक बीड
वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड –४३११२२ ( महाराष्ट्र ) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ ( महाराष्ट्र ) येथून प्रसिद्ध केले. **संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** ( या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही ) ( वाद–विवाद बीड न्याय कक्षेत ) मो. 9022952922

विशेष



# सूर्य आणि चंद्राच्या अशुभ संयोगामुळे या राशीच्या लोकांनी घ्यावी तब्येतीची काळजी

बुधवार, 23 एप्रिल रोजी दुपारी 12 .40 वाजता सूर्य आणि चंद्राचा अशुभ वैधृती योग तयार होत आहे . त्याचा मनावर आणि कामावर नकारात्मक परिणाम होतो . कोणत्या राशींना अत्यंत सावधगिरी बाळगण्याची गरज आहे ते जाणून घेऊया . बुधवार, 23 एप्रिल रोजी दुपारी 12 .40 वाजता सूर्य आणि चंद्र अशुभ वैधृती योग निर्माण करतील . ज्योतिषशास्त्रात हा योग अशुभ मानला जातो, जो मन आणि कार्यक्षमता दोन्हीवर परिणाम करतो . सूर्य आत्मा, नेतृत्व आणि आत्मविश्वास दर्शवतो, तर चंद्र मन, भावना आणि मानसिक स्थिती दर्शवतो . जेव्हा हे दोन्ही ग्रह वैधृती योगात येतात तेव्हा व्यक्तीची निर्णय घेण्याची क्षमता कमकुवत होऊ शकते आणि मनातील अस्थिरता वाढते .

## राशींवर होणारा परिणाम

बुधवार, 23 एप्रिल रोजी सूर्य आणि चंद्राच्या अशुभ वैधृती योगामुळे, विशेषत : तीन राशींवर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे . या राशीच्या लोकांमध्ये जन्मलेल्या लोकांना यावेळी मानसिक अशांतता, कामात अडथळे आणि कौटुंबिक तणावाचा सामना करावा लागू शकतो . कोणत्या राशीच्या लोकांच्या जीवनावर याचा काय परिणाम होईल ते सविस्तरपणे जाणून घेऊया .

## मिथुन रास

मिथुन राशीच्या लोकांसाठी हा काळ मानसिक ताण आणि गोंधळाने भरलेला असू शकतो . मन पुन्हा पुन्हा भटकू शकते आणि तुम्ही महत्त्वाच्या कामांवर लक्ष केंद्रित करू शकणार नाही . छोट्या छोट्या गोष्टींबद्दल जास्त विचार करण्याची सवय तुम्हाला गोंधळात टाकू शकते . यावेळी कोणताही मोठा निर्णय घेणे तुमच्यासाठी हानिकारक ठरू शकते . तुमच्या दैनंदिन दिनचर्येत ध्यान आणि प्राणायाम यांचा समावेश करणे आणि अनुभवी किंवा विश्वासार्ह व्यक्तीशी सल्लामसलत केल्यानंतरच कोणताही निर्णय घेणे चांगले होईल . भावनांमध्ये वाहून जाऊन गुंतवणूक किंवा नोकरीशी संबंधित कोणतेही मोठे पाऊल उचलू नका .

## कन्या रास

कन्या राशीच्या लोकांसाठी हे संयोजन कामाच्या ठिकाणी आव्हाने आणू शकते . कठोर परिश्रम करूनही अपेक्षित निकाल न मिळाल्याने तुमचा आत्मविश्वास कमी होऊ शकतो . बॉस किंवा सहकाऱ्यांशी संघर्ष होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे कामात अडथळे येऊ शकतात . अशा वेळी, तुम्ही तुमची कामे वेळेवर पूर्ण करण्याचा प्रयत्न करणे आणि संयम राखणे महत्त्वाचे आहे . कोणत्याही प्रकारचा वाद किंवा संघर्ष टाळा, विशेषत : व्यावसायिक वातावरणात ; अन्यथा, तुमचे नुकसान होऊ शकते .

## मकर रास

मकर राशीच्या लोकांसाठी हा काळ आरोग्य आणि कौटुंबिक जीवनाबाबत थोडा चिंताजनक असू शकतो . शारीरिक थकवा किंवा किरकोळ आरोग्य समस्या तुम्हाला त्रास देऊ शकतात . यासोबतच, कुटुंबात एखाद्या गोष्टीबद्दल तणाव किंवा गैरसमज निर्माण होऊ शकतो, ज्यामुळे मानसिक शांती भंग होऊ शकते . यावेळी, तुम्ही तुमच्या आहाराकडे विशेष लक्ष दिले पाहिजे आणि तुमच्या कुटुंबाशी संवाद राखणे खूप महत्त्वाचे असेल . नकारात्मक विचार आणि एकाकीपणापासून दूर राहण्याचा प्रयत्न करा .

# “‘या’ वृत्तीला श्रद्धांजली वाहवी वाटतेय…”, निधनाच्या खोट्या बातम्या पसरवणाऱ्यांवर आदेश बांदेकर संतापले

झी मराठीवरील ‘होम मिनिस्टर’ या कार्यक्रमातून महाराष्ट्रातल्या घराघरांत प्रसिद्ध झालेल्या आदेश बांदेकरांबद्दल एक महत्वाची बातमी आहे . ते सध्या खोट्या बातम्या पसरवणाऱ्यांवर कमालीचे संतापले आहेत .

झी मराठीवरील ‘होम मिनिस्टर’ या कार्यक्रमातून महाराष्ट्रातल्या घराघरांत प्रसिद्ध झालेल्या आदेश बांदेकरांबद्दल एक महत्वाची बातमी आहे . महाराष्ट्राचे लाडके भाऊजी कायमच सोशल मीडियावर सक्रिय असतात . ते सध्या खोट्या बातम्या पसरवणाऱ्यांवर कमालीचे संतापले आहेत . त्या खोट्या बातम्यांचा फक्त भावोजींनाच नाही तर, संपूर्ण त्यांच्या कुटुंबीयांनाही त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे .

काही दिवसांपासून सोशल मीडियावर आदेश बांदेकर यांच्या प्रकृतीबाबतचे खोटे वृत्त पसरवले जात आहेत . त्यांच्या तब्येतीची काळजी वाटत असल्यामुळे त्यांच्या जवळच्या नातेवाईकांनी आणि आप्तेष्टांनी त्यांना संपर्क साधत त्यांच्या तब्येतीची विचारपुस केली . पण त्यावेळी त्यांची तब्येत सुखरुप असून व्हायरल होत असलेल्या बातम्या खोट्या असल्याचं कळालं . अखेर आदेश बांदेकर यांनी जवळच्या लोकांसह चाहत्यांसाठी सोशल मीडियावर सुखरूप असल्याची माहिती देणारा व्हिडीओ शेअर केला आहे . शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये आदेश भावोजींनी आपल्या तब्येतीबद्दल म्हणाले की, आणि खोट्या बातम्या



पसरवणाऱ्यांचाही समाचार घेताना म्हणाले की,

“मी अत्यंत व्यवस्थित आणि सुदृढ आहे . सुखरुप प्रवास करतोय, कारण काळजीपोटी इतक्या जणांचे मला फोन येत आहेत आणि जे संपर्क साधू शकत नाहीयेत ते हळहळ व्यक्त करत आहेत . यामागील कारणही तसेच आहे . आपले खूप हितचिंतक असतात तसेच कुणीतरी अत्यंत अतृप्त भावनेने वेगवेगळ्या बातम्या पसरवत असतात . आता ही वृत्ती आहे या वृत्तीला कोणी काही करू शकत नाही . बरं, बातम्या पसरवत असताना आदेश बांदेकरांच्या हृदयाचे ठोके मंदावले इथंपासून ते अगदी निधनापर्यंत, श्रद्धांजली सुद्धा काही जणांनी अर्पण केल्या आहेत . हे सारं काही माझ्यापर्यंत होते तोपर्यंत ठीक होते, मी हसण्यावारी नेले . या सर्व वृत्तीकडे दुर्लक्ष करत होतो . पण आताच मी सोशल मीडियावर पाहिले तर मनोरंजन क्षेत्रातले अनेक दिग्गज, अनेक कलावंत जे इतके काम करत आहेत, प्रवास करत आहेत . त्यांच्याबाबतच्या बातम्या सुद्धा अशाच होत्या . कोणाचा घाटात अपघात झाला, संपूर्ण बसचा अपघात झाला तर कोणाला थेट पोहोचवण्यापर्यंत . आता या सर्वांना पोहोचवण्याची वेळ आलीय, असं मला वाटतं . पोहोचवयाचं असेल तर ही वृत्ती नाहीशी व्हायला पाहिजे . ही वृत्ती नाहीशी करायची असेल तर स्वत :चे व्ह्युज वाढवण्यासाठी इतरांच्या नावाचा वापर करून चार पैसे कमावण्याचा हा जो धंदा आहे ना तो बंद पाडायचा असेल तर याला जास्तीत जास्त लोकांनी रिपोर्ट केले पाहिजे . कारण ही वृत्ती अत्यंत घातक आहे आणि त्यांच्यामुळे कोणाचं तरी नकळत नुकसान होऊ शकते . तेव्हा या वृत्तीला श्रद्धांजली वाहावी असे मला मनापासून वाटतं आणि किमान 25 ते 30 मराठी इंडस्ट्रीतल्या कलावंताबद्दल अशा पद्धतीची बातमी आपल्याआपल्या पेजवर टाकणाऱ्या वृत्तीला मी मनापासून श्रद्धांजली अर्पण करतो . हसावं नाही तर काय करावे ? मी मात्र व्यवस्थित – सुदृढ आहे आणि ज्यांनी ज्यांनी माझ्या काळजी पोटी मला फोन केला, सर्वांना सांगतो मी व्यवस्थित आहे”

# चिखलात अडकलेल्या चिमुरडीसाठी दिशा पाटनीची बहीण बनली देवदूत, बेवारस मुलीचे वाचवले प्राण

बॉलिवूड अभिनेत्री दिशा पाटनीची बहिण खुशबू पाटनी ही माजी लष्करी अधिकारी आहे . अलीकडेच, दिशाची बहिण खुशबू हिने असं काही केलं आहे, ज्यामुळे तिचं खूप कौतुक होत आहे .

बॉलिवूड अभिनेत्री दिशा पाटनीने आपल्या सौंदर्याच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे . कायमच कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत राहणारी दिशा तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आली आहे . दिशा पाटनीची बहिण खुशबू पाटनी ही माजी लष्करी अधिकारी आहे . अलीकडेच, दिशाची बहिण खुशबू हिने असं काही केलं आहे, ज्यामुळे तिचं खूप कौतुक होत आहे . दरम्यान, खुशबू पाटनीने एका चिखलात अडकलेल्या चिमुरडीचा जीव वाचवला आहे . खुशबू पाटनीने तिच्या इन्स्टाग्रामवर हा व्हिडिओ स्वत : शेअर केलेला आहे, तिचा हा व्हिडिओ पाहून नेटकरी कौतुक करीत आहे .खुशबूने बरेलीमध्ये एका चिमुरडीचा जीव वाचवला आहे, त्यामुळे सर्वच स्तरातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव केला जात आहे . खुशबूच्या घराच्या मागे एक पडिक जागेत कोणीतरी त्या लहान मुलीला सोडून गेल्याचं खुशबूनं सांगितलं . पाटनी कुटुंबाने चिमुरडीला बरेली पोलिसांच्या स्वाधीन केलं असून तिचं नाव राधा असं ठेवलं आहे . दरम्यान, खुशबू पाटनीने तिच्या इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये एक लहान मुलगी चिखलात अडकलेली दिसत असून ती रडताना दिसत आहे . व्हिडिओमध्ये खुशबू म्हणते की, “माझ्या घराच्या पाठीमागे एक मोकळी जागा आहे . त्या मोकळ्या जागेमध्ये या चिमुरडीला कोणीतरी सोडून गेलं होतं .” त्यानंतर, ती बाळावर प्रेम करताना दिसत आहे . त्या मुलीच्या कपड्यांवरील घाण साफ करते आणि तिला उचलून घेऊन जाते . खुशबू बाळाला दूध पाजते आणि तिला पुढे पोलिसांच्या स्वाधीनही तिने केलं .

व्हिडिओच्या शेवटी खुशबूने सांगितलं की, बाळाच्या रडण्याचा आवाज माझ्या आईला सर्वात आधी ऐकू आला . त्यानंतर तिची आई आणि त्यांची घरातील कामवाली बाई दोघी घराच्या मागील भागात



गेले . तितक्यात तिकडे खुशबूही गेली . त्यानंतर तिने खुशबूने तिला आपल्या ताब्यात घेतले .

मुलीचा चेहरा दाखवताना खुशबू म्हणाली, ‘जर ही मुलगी बरेलीची असेल आणि ही तुमच्या कोणाच्या ओळखीत मुलगी असेल तर आम्हाला सांगा की तिचे आईवडील तिला इथल्या विचित्र जागेमध्ये कसे सोडून गेले . मला अशा पालकांची लाज वाटते .” खुशबू मुलीच्या चेहऱ्यावरील जखमा देखील दाखवतेय आणि त्यानंतर ती तिला बरेली पोलिसांच्या स्वाधीन करते . ती म्हणते की, आधी तिच्यावर उपचार केले जातील आणि नंतर पुढील कारवाई केली जाईल . दिशा पाटनीच्या बहिणीने पुढे सांगितलं की, तिने मुलीला पाहताच तिचं नाव राधा ठेवलं . ती बाळाचा मागोवा घेत राहील आणि तिच्या चाहत्यांसह पुढील माहिती शेअर करेल .

या व्हिडिओसोबत खुशबूने एक लांबलचक कॅप्शन लिहिलं – ‘ज्याचं परमेश्वर रक्षण करतो, त्याला कोणीही हानी पोहोचवू शकत नाही . मला आशा आहे की अधिकारी तिची काळजी घेतील आणि पुढे जे काही ऑर्डर सिरीज असतील ते योग्य नियम आणि कायद्यांसह अंमलात आणले जातील .’ खुशबूने पोस्टमध्ये बरेली पोलिस, यूपी पोलिस, मुख्यमंत्री योगी, महिला आणि बाल विकास मंत्रालय, पंतप्रधान मोदी आणि महिला आणि बाल विकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांना टॅग केलं आहे . खुशबूने पुढे म्हटलं आहे की, ‘कृपया आपल्या देशातील मुलींना वाचवा !’ हे सगळं किती काळ चालणार ? तिला योग्य लोकांच्या स्वाधिन केलं आहे . योग्य लोकांच्या हातात तिचं आयुष्य गेल्यामुळे नक्कीच तिचं जीवन समृद्ध होईल, याची मी खात्री करेन . एखाद्याच्या नशिबात जे घडतं ते चांगलंच असतं . ते कोणीही बदलू शकत नाही . हे कृष्णा .’ दरम्यान, खुशबूच्या कामाचे सर्वच स्तरातून कौतुक केले जात असून फक्त चाहतेच नाही तर सेलिब्रिटींकडूनही तिचं कौतुक केलं आहे .

दिशा पाटनीच्या बहिणीबद्दल सांगायचे तर, तिच्या बहिणीचं नाव खुशबू पाटनी आहे . ती पेशाने माजी लष्करी अधिकारी आहे . दिशाप्रमाणेच खूशबू सुद्धा सुंदर आणि फीट दिसतेय . अनेकदा दिशाच्या व्हिडिओ, फोटोमध्ये तिची झलक दिसते . तिने डेहराडूनच्या इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधून इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक इंजिनिअरिंग केलं आहे .

# प्रसिद्ध डॉक्टरच्या आत्महत्येप्रकरणी महिलेला पोलीस कोठडी



सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ . शिरीष वळसंगकर यांनी राहत्या घरी १८ एप्रिल रोजी आत्महत्या केली . डोक्यात गोळी घालून घेत त्यांनी आयुष्य संपवलं . या प्रकरणात सदर बाजार पोलिसांनी वळसंगकर रुग्णालयात काम करणाऱ्या मनीषा महेश मुसळे उर्फ मनीषा माने नावाच्या महिलेला अटक केली होती . या महिलेला सोलापूर सत्र आणि दिवाणी न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी ठोठावली . न्यायदंडाधिकारी दीपक कंखरे यांनी हा निर्णय दिला .


कामावरुन काढून टाकल्यानंतर मनीषा महेश मुसळे उर्फ मनीषा माने नावाच्या महिलेने डॉ . शिरीष वळसंगकर यांना पत्र पाठवले होते . या पत्रात कामावर परत घेतले नाही तर आत्महत्या करेन, अशी धमकी दिली होती . हे पत्र मिळाल्यानंतर डॉ . शिरीष वळसंगकर यांनी १८ एप्रिल रोजी घरी येऊन रात्री साडेआठ वाजता स्वत :चे परवाना असलेले शस्त्र हाती घेतले आणि डोक्यात गोळी घालून घेत आत्महत्या केली . आत्महत्या करण्याआधी डॉक्टरांनी एक चिठ्ठी लिहून ठेवली होती . या चिठ्ठीत मनीषामुळे टोकाचे पाऊल उचलत असल्याचा उल्लेख होता . ही चिठ्ठी बिघतल्यानंतर पोलिसांनी चौकशी केली आणि मनीषा महेश मुसळे उर्फ मनीषा माने नावाच्या महिलेला अटक केली . यानंतर महिलेविरोधात पोलिसांनी पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली आहे .

प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ . शिरीष वळसंगकर १८ एप्रिल रोजी रात्री घरी आले . ते हात धुण्याच्या निमित्ताने बेडरूमच्या बाथरूममध्ये गेले . तिथेच त्यांनी डोक्यात गोळी घालून घेत आत्महत्या केली . गोळीबाराचा आवाज ऐकून घरातील सर्वांनी डॉ . शिरीष वळसंगकर यांच्या बेडरूमच्या दिशेने धाव घेतली . बाथरूमच्या जमिनीवर डॉक्टर रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे बघून घरातल्या सर्वांनाच धक्का बसला . डॉक्टरांना तातडीने वळसंगकर रुग्णालयात नेण्यात आले . तिथे डॉक्टरांनी तपासणी केली आणि न्यूरोसर्जन डॉ . शिरीष वळसंगकर यांचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले . घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली . माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी हॉस्पिटलमध्ये आले . यानंतर लगेच तपासाला सुरुवात झाली .

## डॉ. अश्विन वळसंगकर यांनी केली तक्रार

डॉ . अश्विन शिरीष वळसंगकर यांनी प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ . शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्येप्रकरणी मनीषा महेश मुसळे उर्फ मनीषा माने नावाच्या महिलेबाबत संशय व्यक्त केला . यानंतर पोलिसांनी तपास केला आणि तातडीने कारवाई केली .

# महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. ‘शुक्रतारा’ हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर



विशेष



## मेष, सिंह, तूळ, कुंभ राशीसह इतर राशींसाठी सोमवारचा दिवस कसा असेल, जाणून घ्या

मंगळवार, २२ एप्रिल. सोमवारचा दिवस काही राशीच्या लोकांसाठी विशेष असणार आहे. मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या यासह सर्व राशींसाठी खास आहे. सर्व राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस कसा असेल जाणून घ्या

### मेष रास

मेष राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर उद्या या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

### वृषभ रास

वृषभ राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु उद्या भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून उद्यापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास उद्या यशस्वी होईल.

### मिथुन रास

मिथुन राशीसाठी उद्याचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्ही शेअर बाजार आणि सट्टेबाजीमध्ये पैसे गुंतवू शकता.

### कर्क रास

कर्क राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. उद्या तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. व्यवहारांशी संबंधित कोणतीही बाब तुमच्यासाठी मानसिक त्रास निर्माण करू शकते. तुमच्या मुलांकडून काही चांगली बातमी मिळू शकते. तुम्हाला काही कामासाठी कमी अंतराच्या प्रवासाला जावे लागू शकते.

### सिंह रास

सिंह राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण उद्या गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. जर तुम्हाला कोणतेही नवीन काम सुरू करायचे असेल तर ते तुमच्यासाठी चांगले राहील. जर तुमच्या भावा-बहिणींसोबत कोणत्याही गोष्टीवरून वाद सुरू असेल तर तो मिटेल आणि तुमचे नाते सुधारेल.

### कन्या रास

कन्या राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. उद्या एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. प्रेम जीवनाच्या बाबतीत दिवस उत्साहवर्धक असेल. तुमच्या मुलांकडून काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. तुम्हाला काही कामासाठी कमी अंतराच्या प्रवासाला जावे लागू शकते.

### तूळ रास

उद्या, सोमवार तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी उद्याचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. जर तुम्ही तुमच्या जोडीदारापासून काही गोष्टी लपवून ठेवल्या असतील तर त्या तुम्हाला उघड होऊ शकतात, म्हणून तुम्ही स्वत: त्याला सर्व काही सांगितले तर बरे होईल. नवीन मालमत्ता खरेदी करण्याचे तुमचे स्वप्न पूर्ण होईल.

### वृश्चिक रास

वृश्चिक राशीचे राशीचे उद्या तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, ● पान २ वर...

# तरुणांचा धाब्यावर राडा; भांडण सोडवण्यास गेलेल्या धाबा मालकाचा बेदम मारहाणीत मृत्यू

## ➤ मुलगा व स्वयंपाकी गंभीर जखमी

**माजलगाव / प्रतिनिधी :** शहराजवळील परभणी रस्त्यावर असलेल्या नागडगाव फाट्यावरील गावरान धाब्यावर रविवारी रात्री जेवनास आलेल्या युवकांमध्ये आपसातील भांडणे झाली. यावेळी मध्यस्थी करणाऱ्या धाबा चालक महादेव निवृत्ती गायकवाड (५५), मुलगा आशितोष महादेव गायकवाड यांना युवकांनी जबर मारहाण केली. यात धाबाचालक महादेव गायकवाड यांचा राजी उपचारादरम्यान छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यू झाला. तर त्यांचा मुलगा आशितोष (२५), स्वयंपाकी शेख बुढण हे दोघे गंभीर जखमी आहेत.





शहरापासून जवळच राष्ट्रीय महामार्ग-६१ पाथरी रोडवर नागडगाव फाटा येथे महादेव निवृत्ती गायकवाड (रा. मंगलनाथ कॉलनी) यांचे गावरान ढाबा हॉटेल आहे. या हॉटेलवर रविवारी रोहित शिवाजी थावरे व त्याच्या चार मित्रांनी सायंकाळी सहा वाजता मासे बनविण्यासाठी आणून दिले. जेवण केल्यानंतर सायंकाळी ७ च्या सुमारास त्यांच्यात वादविवाद झाला. यातून त्यांनी धाब्यावर तोडफोड करण्यास सुरुवात केली. हा प्रकार निदर्शनास आल्याने आशितोष गायकवाड यांने त्या युवकांना समजविण्याचा प्रयत्न केला. मात्र, रोहित शिवाजी थावरे याने काठीने आशितोष याच्यावर हल्ला करत गंभीर जखमी केले. त्याचवेळी भांडण सोडविण्यास आलेल्या महादेव गायकवाड यांनाही या युवकांनी काठीने बेदम मारहाण केली. हे पाहून स्वयंपाकी शेख बुढन हे भांडण सोडवण्यासाठी आले असता त्यांनाही मारहाण करण्यात आली.

त्यानंतरही त्या युवकांनी धाब्यावर राडा माजवत गायकवाड पितापुत्रास बेशुद्ध होईपर्यंत मारहाण करत तेथुन पोबारा केला. या वेळी परीसरात असलेल्या लोकांनी वाहनात घालून त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी प्रथम उपचार करून जखमी महादेव गायकवाड यांना तात्काळ छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यास सांगितले. रात्री उशिरा उपचारादरम्यान महादेव गायकवाड यांचा मृत्यू झाला. तर तर मुलगा आशितोष गायकवाड, शेख बुडन यांच्यावर खाजगी रुग्णालयात दुसऱ्या दिवशीही उपचार सुरू आहेत. दरम्यान, या प्रकरणी आशितोष गायकवाड यांच्या फिर्यादीवरून रोहित शिवाजी थावरे रा. आनंदगाव व इतर ५ जणांविरुद्ध माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मागील आठवड्यात शहरामध्ये बाबासाहेब आगे यांचा निघृण खून भररस्त्यावर करण्यात आला होता. यामुळे गुंडांच्या दहशतीचे सावट शहरावर पसरलं आहे. या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस अधिक तपास करत आहेत.

**सर्व आरोपींची नावे घ्यावीत, पोलिस ठाण्यासमोर ठिय्या**

● यादीमध्ये सर्व आरोपीचे नावे घेण्यात यावी व आरोपींना तात्काळ अटक करावी या मागणीसाठी नातेवाईकांनी महादेव गायकवाड यांचा मृतदेह दोन तास ग्रामीण पोलीस ठाण्यासमोर आणून ठेवला होता. पोलिसांनी आश्वासन दिल्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला. माजलगाव येथील मंगलनाथ स्मशानभूमी येथे गायकवाड यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## "गाळ मुक्त धरण व गाळयुक्त शिवार, जलयुक्त शिवार" योजनेचा मंगरूळ येथे शुभारंभ



माजलगाव : महाराष्ट्र शासन, टाटा मोटर्स व नाम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने "गाळ मुक्त धरण व गाळयुक्त शिवार, जलयुक्त शिवार" असा दुहेरी फायदा असलेल्या योजनेचा शुभारंभ मंगरूळ येथे आज आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या हस्ते संपन्न झाला. या वेळी नाम चे राजाभाऊ शेळके, मा सभापती कल्याण आबुज आदी.

## सहकार चळवळ ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा: सहकारमंत्री ना.बाबासाहेब पाटील

**लोकनेते सुंदररावजी सोळंके नागरी सहकारी पतसंस्थेच्या तेलगाव शाखेचे उद्घाटन**

**➤ माजलगाव / अरविंद ओव्हाळ**

सहकाराशिवाय महाराष्ट्राची प्रगती अपूर्ण आहे. आज ग्रामीण भागातील आर्थिक विकासाचा मुख्य आधार सहकार चळवळच आहे. या क्षेत्रात गुंतवणूक करणे म्हणजे समाजाच्या उन्नतीत भागीदार होणे आहे असे भावपूर्ण उद्‌गार सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी काढले ते तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके नागरी सहकारी पतसंस्था मर्या. माजलगाव यांच्या तेलगाव (सुंदरनगर) येथील नवीन शाखेचे उद्‌घाटन प्रसंगी बोलत होते.

या वेळी पुढे म्हणाले की सहकारमंत्री बाबासाहेब पाटील की "महाराष्ट्राची सहकारी चळवळ जगात अग्रेसर आहे. बिहारमध्ये सर्व सुविधा असूनही सहकार चळवळ पुढे नेता आली नाही. परंतु महाराष्ट्रात अनेक नेत्यांच्या योगदानामुळे सहकार क्षेत्र प्रगतीपथावर आहे." त्यांनी पतसंस्थेच्या कार्याचे कौतुक करताना पुढे सांगितले की, "चांगले होत असेल तर चांगल्या माणसाचे ऐकले पाहिजे. सरकारच्या नियमावलीनुसार प्रकाश दादा सोळंके ही पतसंस्था उत्तम पद्धतीने चालवत आहेत." कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नारायणबाबा संस्थान, वांगी येथील अध्यक्ष ह.भ.प. एकनाथ महाराज माने यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी बीड श्री. अविनाश पाठक, जिल्हा निबंधक सहकारी





संस्था, बीड येथील श्री. समृत जाधव आणि विभागीय अधिकारी बुलढाणा अर्बन बँक, बीड यांचे श्री. संजय देशमुख यांची उपस्थिती होती. माजलगाव मतदारसंघाचे विद्यमान आमदार तथा मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. प्रकाशदादा सुंदररावजी सोळंके आणि लोकनेते सुंदरराव सोळंके हे देखील या सोहळ्यास उपस्थित होते.

स्वागताध्यक्ष म्हणून लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष श्री. वीरेंद्र सोळंके आणि उपाध्यक्ष चेअरमन श्री. जयसिंग सोळंके यांनी मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात पतसंस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सौ. मंगलाताई प्रकाशदादा सोळंके, दीनबंधू महिला नागरी सहकारी पतसंस्था अध्यक्षा सौ. पल्लवीताई विरेंद्र सोळंके तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुहास सोळंके यांचे योगदान मोलाचे ठरले. नवीन शाखेच्या सुरुवातीमुळे परिसरातील नागरिकांना आर्थिक व्यवहारांसाठी जवळच्या ठिकाणी सेवा उपलब्ध होणार असून, स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे. पतसंस्थेच्या या विस्तारामुळे सहकार क्षेत्राच्या विकासाला नवी गती मिळणार असल्याचे सर्व मान्यवरांनी या वेळी नमूद केले.

## जामीन मिळाल्याचे खोटे प्रमाणपत्र देऊन आरोपीला नेले पळवून

**- दोन वकिलांसह आरोपीविरुद्ध माजलगावात गुन्हा**

**➤ माजलगाव / प्रतिनिधी :** उच्च न्यायालयाकडून अंतरिम जामीन मिळाल्याचे खोटे प्रमाणपत्र देऊन ॲट्रॉसिटीच्या गुन्ह्यात ताब्यात घेतलेल्या आरोपीच्या अटकेला प्रतिबंध करत त्याला पळवून नेल्याचा प्रकार माजलगावात घडला. याप्रकरणी ॲड. प्रवीण अंभोरे, सुशील शेंडगे व रोहिदास उर्फ रुद्रा हरिभाऊ कुरे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद झाला आहे.

तालुक्यातील पुनंदगाव येथील रोहिदास उर्फ रुद्रा हरिभाऊ कुरे याच्या विरोधात ॲट्रॉसिटीचा गुन्हा नोंद होता. व तो फरार होता. १७ एप्रिल रोजी फौजदार माकणे यांनी त्याला ताब्यात घेतले. यावेळी त्याने उच्च न्यायालयातून अंतरिम जामीन मिळाल्याचे सांगितले. त्यानंतर त्याने ॲड. प्रवीण अंभोरे यांना बोलावून घेतले. त्यांनीही ॲड. सुदर्शन सोळुंके यांच्यामार्फत उच्च न्यायालयातून जामीन मिळाल्याचे सांगितले. पोलिसांनी सोळुंके यांना फोन लावण्यास सांगितले असता त्यांचे सहायक म्हणून सुशील शेंडगे या वकिलांना फोन लावून दिला. त्यांनीही जामीन मिळाला असून, अद्याप आदेशाची प्रत मिळाली नसल्याचे सांगितले. त्यासाठी त्यांनी प्रमाणपत्रही दिले. त्यामुळे पोलिसांनी कुरे याला सोडून दिले.

मात्र, संशय आल्याने दुसऱ्या दिवशी ॲड. सुदर्शन सोळंके यांना संपर्क केला असता त्यांनी या प्रकारचा पक्षकार माझ्याकडे आला नाही व शेंडगे नावाचा वकीलही आपल्याकडे काम करत नाही, असे सांगितले. त्यानंतर दोन वकील व आरोपींविरोधात खोटी माहिती व प्रमाणपत्र दिल्याप्रकरणी फौजदार के. बी. माकणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## युग प्रवर्तक चषक स्पर्धेत क्वालिटी स्पोर्ट्स क्लब संघ उप विजेता

**➤ माजलगाव : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महा. राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने युगप्रवर्तक चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात येत असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी क्रिकेटपटू शिक्षक व इतर कर्मचारी या स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. या साखळी सामन्यात एकही मॅच न हरता सहभागी सुंदरराव सोळंके महाविद्यालय संघ, ईगल वूड, पोलीस इलेव्हन, आय के एन, व एफ जी एस या संघांना नमवून लीग मॅचेस च्या पॉईंट टेबल वर प्रथम क्रमांक असणारा मानकरी क्वालिटी स्पोर्ट क्लब संघ ठरला. तरी या संघावर सर्व स्तरातील क्रीडा प्रेमींकडून शुभेच्छांचा वर्षा होत आहे.

गेली अकरा वर्षापासून सलग युग प्रवर्तक चषक हे यशस्वीरित्या आयोजन करण्यात येते. युगप्रवर्तक चषक बक्षीस वितरण समारंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका माजलगाव या ठिकाणी पार पडले असता या कार्यक्रमाची सुरुवात विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर



यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून मा. राहुलजी सुर्यतळ साहेब (पोलीस निरीक्षक शहर पोलीस स्टेशन माजलगाव) मा माकणे साहेब (पी आय शहर पोलीस स्टेशन माजलगाव), मा. इम्रानजी नाईक (युवा उद्योजक), मा. रमेशजी फपाळ सर, मा. प्रशांतजी तौर सर, मा. विलासजी शेजुळ सर, मा. शेख सलीम सर (युवक जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी), मा. नारायणजी कचरे सर, मा. अशोक लांडगे (ता. अ. राष्ट्रवादी शि. संघटना) उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाची तालुकाध्यक्ष मा. राहुलजी टाकणखार सर व सर्व उपस्थित मान्यवर यामध्ये मा. प्रभाकर साळवे, मा. अमोल राऊत, प्रमोद साळवे, लक्ष्मण सरवदे, माणिक राठोड, अबूबकर, सिद्दिकी, बाबा जाधव, तोकलवाड सर, सुहास बोराडे, अबू शेरा, अभिमन्यू इबिते, वसंत टाकणखार, रवी आदमाने यांच्या सह विविध संघटनेचे पदाधिकारी, शिक्षक नेते, वरीष्ठ शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारत टाकणखार सर यांनी केले. तर सूत्रसंचालन निलेश गावडे सर यांनी केले. याप्रसंगी सर्व मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

## भजनी व कीर्तनकारांना अन्नदान करणाऱ्या प्रताप पवार यांचा घळाटवाडी ग्रामस्थांच्या वतीने सत्कार



माजलगाव - तालुक्यातील घळाटवाडी येथे कै. किसनराव पवार काका यांच्या कृपाशीर्वादाने सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात पवार कुटुंबीयांच्या वतीने बाहेरगवाहून येणाऱ्या भजनी व कीर्तनकारांना अन्नदान केले जाते. याबद्दल पवार कुटुंबियातील प्रताप पवार यांचा घळाटवाडी ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करताना हभप गोविंद महाराज गोरे आळंदीकर, प्रगतशील शेतकरी बबलू भाऊ घाडगे, महाराष्ट्रातील प्रसिद्ध मृदंग वादक भरत महाराज पठाडे, शत्रुघ्न महाराज पठाडे व ग्रामस्थ.

## ब्रह्माकुमारीज केंद्राच्या लोकार्पण सोहळ्यास उपस्थित रहा - अनितादिदी

**➤ माजलगाव / प्रतिनिधी :** प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या नवीन 'प्रभू दर्शन भवन' वास्तूचे लोकार्पण सोहळा दि. २२ एप्रिल मंगळवार रोजी संपन्न होत आहे. या कार्यक्रमासाठी ब्रह्माकुमारी मुख्य ठिकाण माउंट आबू येथील राजयोगिनी उषा दीदीजी आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी वक्त्या तसेच मा. आ. श्री. प्रकाशदादा सोळंके आमदार माजलगाव, तसेच प्रमुख पाहुणे मा. श्री. मोहनराव काका सोळंके, माजी आमदार माजलगाव, राजयोगिनी सोमप्रभा दीदीजी संचालिका उपक्षेत्र सोलापूर यांच्या हस्ते ब्रह्माकुमारी सेंटरचा लोकार्पण सोहळा संपन्न होणार आहे. याकरिता पत्रकार परिषद घेण्यात आली.



यामध्ये आजच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक ताण-तणाव, नैराश्य, भय, दु:ख, अशांती कशी कमी करता येईल तसेच व्यसनमुक्त करणे, डिप्रेशनमुळे होणाऱ्या आत्महत्या पासून रोखणे, योग्य मार्गदर्शन करणे हे सर्व कार्य विनामूल्य ईश्वराचे ज्ञान मिळवण्यासाठी ब्रह्माकुमारीद्वारे 'राजयोग मेडिटेशन' विनामूल्य शिकवल्या जाते. माजलगाव शहरांमध्ये 'प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे' नवीन वास्तू सेवाकेंद्र "प्रभू दर्शन भवन" उद्‌घाटन करण्यात येत आहे. अशी माहिती पत्रकार परिषदेमध्ये माजलगाव सेवा केंद्र संचालिका अनिता दीदी, बीड सेवा केंद्र संचालिका प्रज्ञादीदी यांनी दिली. पत्रकार परिषदेच्या शेवटी सर्व पत्रकार बांधवांना कुरूडवाडी सेवा केंद्र संचालिका, गोदावरीदीदी यांनी मेडिटेशनचा अनुभव करून घेतला. शेवटी उपस्थित पत्रकार व बंधू-भगिनींचे आभार शिलादीदी यांनी मानले.